# प्रेसनोट दि.०७.०९.२०२२

**आरोपी लोकसेवक जमीर बाबासो सोलापुरे वय ४७ वर्षे, लिपीक, होमगार्ड उप पथक सांगली, रा गिता हौसींग सोसायटी, प्लॉट नं ४१ संजयनगर ता मिरज, जि. सांगली यांनी ५०००/- रुपये लाचेची मागणी केल्याने गुन्हा दाखल. सांगली लाच लुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.**

---

तक्रारदार यांची होमगार्ड उप पथक सांगली येथे पुर्ननोंदणी करणे करीता जमीर बाबासो सोलापुरे, लिपीक, होमगार्ड उप पथक सांगली यांने तक्रारदार यांचेकडे ७,०००/- रूपयेची लाच मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी इकडील कार्यालयाकडे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी दिले तक्रारीची ब्युरोच्या कार्य प्रणाली प्रमाणे दि.२७.०४.२०२२ रोजी, दि. ०५.०५.२०२२ रोजी व दि.२३.०५.२०२२ रोजी पडताळणी केली असता पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार यांची सांगली होमगार्ड उप पथकात पुर्ननोंदणी करणे करीता जमीर बाबासो सोलापुरे यांनी तक्रारदार यांचेकडे ५,०००/- रुपये लाचेची मागणी केले असल्याचे निष्पन्न झाले.

त्याअनुषंगाने श्री जमीर बाबासो सोलापुरे, लिपीक, होमगार्ड उप पथक सांगली यांचे विरुध्द विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल झाला आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री सुरज गुरव सो अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, सांगली, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक तसेच पोलीस अंमलदार अविनाश सागर, धनंजय खाडे, प्रितम चौगुले, संजय संकपाळ, रविंद्र धुमाळ, श्रीपती देशपांडे, सीमा माने, राधीका माने, विना जाधव चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली
सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सांगली.